"नशामुक्ती जनजागृती अभियान-मुंबई २०२६ " अंतर्गत आयोजित सामुहिक शपथ कार्यक्रमासाठी व्यापक सहभाग सुनिश्चित करणेबाबत

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय
प्रशासकीय इमारत, ४ था मजला ,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी क्रमांक
Email ID - dytcadmin.tpt-mh@gov.in, dycommr.admin@gmail.com

परिपत्रक क्र. ४२/ पआका/का.८(१)/ नशामुक्ती जनजागृती अभियान / २०२६ /जा.क्र. ८५८८ दिनांक 29 JUL 2026

संदर्भ : मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जाक्र मंत्री कौ,उद्यो,रोज,नावि./टिप्पणी/०५०५/२०२६, दिनांक २८.०७.२०२६

प रि प त्र क

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शनाखाली गठीत नशामुक्ती जनजागृती उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून मुंबई शहर व मुंबई उपनगरात "नशामुक्ती जनजागृती अभियान-मुंबई २०२६" व "सामुहिक शपथ कार्यक्रम" राबविण्यात येत असून युवकांमध्ये अंमली पदार्थ व विविध व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी जागरुकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक दृष्टिकोन विकसित करणे आणि नशामुक्त समाजनिर्मितीसाठी शाळा- महाविद्यालयांचा विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

या अभियानांतर्गत गुरुवार दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता एन.एस.सी. आय. डोम, वरळी, मुंबई येथे मा . मुख्यमंत्री महोदयांचे शुभहस्ते ड्रग फ्री मुंबई या मोहिमेचा शुभारंभ होत आहे. या कार्यक्रमात सामुहिक नशामुक्ती शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अंमली पदार्थ व्यसन मुक्ती शपथेचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

परिवहन विभागातील सर्व क्षेत्रीय कार्यालयप्रमुखांना एतद्वारे आदेशित करण्यात येते की, त्यांचे अधिनस्त कार्यालयामध्ये, सोशल मिडीया माध्यमे, येथे सदर कार्यक्रमाचा व्यापक प्रचार-प्रसार करण्यात यावा. त्याचप्रमाणे सदर कार्यक्रमाचे आपल्या अधिनस्त कार्यालयांमध्ये प्रक्षेपण करण्यात यावे. संदर्भाधीन पत्राची प्रत सुलभ संदर्भासाठी सोबत जोडण्यात येत आहे.

कार्यक्रमाची ऑनलाईन लिंक पुढीलप्रमाणे : https://webcast.gov.in/Maharashtra/

उपरोक्त सूचनांचे सर्व संबंधितांनी गांभीर्याने पालन करावे.

(मा. परिवहन आयुक्त यांचे निर्देशानुसार)

सहपत्र : वरीलप्रमाणे

(विनोद मल्हारी जाधव)
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (आस्थापना)
परिवहन आयुक्त कार्यालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता
२. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालये यांना उचित कार्यवाहीकरिता
३. सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालये, यांना उचित कार्यवाहीकरिता
४. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव
५. सह परिवहन आयुक्त (संगणक), महाराष्ट्र राज्य मुंबई यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी सदर परिपत्रक विभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच सदर कार्यक्रमाचा परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर व्यापक प्रचार-प्रसार करण्यात यावा.
६. मा. परिवहन आयुक्त यांचे स्वीय सहायक, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. परिपत्रक नोंदवही